स्थायी समितीच्या मंगळवार दिनांक 10–10–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 3. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 4. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 5. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 12. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 13. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 2. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. जयंत दांडेगावकर, अति. उपायुक्त
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 166ः– {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २६ – क अंतर्गत सेट झेविअर्स स्कुल जवळील नाल्याला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रूपये ३०,९५,८४३/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 167ः— धंतोली झोन क्र. ४, प्रभाग क्र. ३५/ब अंतर्गत विविध
{विद्युत विभाग} वस्त्यांमध्ये विद्युत खांब उभारुन प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु.३०,६४,८९०/- च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 168ः— महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेली मौजा—नागपूर,
{स्थावर विभाग} न.भु. क्र. १०१,आराजी १७५८.२०८चौ.मी. मौजा—हिवरी न.भु.क्र. ४९४, ४९२ आराजी १३८२.६८चौ.मी. मौजा—पारडी, न.भु.क्र. ३२९, ३३१, ३९१, ३७५, ४३१, आराजी ३५११.३५ चौ.मी. जागा नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशनला वाहनतळाच्या वापरासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ब) मधील तरतुदीनुसार अस्थायी स्वरुपात प्रथम ११ महिण्याचे कालावधीकरीता अनुक्रमे प्रती महीना भाडे रु. ३,६२,१९१/—,रु. ३,५६,७३१/— व रु. ४,४४,७७१/— आकारुण खालील अटी व शर्थीच्या अधिन राहुन देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा व आवश्यकतेनुसार वाढीव मुदतवाढ देण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेवून,

अटीं व शर्थी : —

१. सदर जागा नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशनला वाहनतळाकरीता ११ महिण्याच्या कालावधीसाठी अस्थायी भाडेतत्वावर हस्तांतरीत करावयाची असल्याने उपरोक्त नमुद नुसार भाडेरक्कमेचा भरणा करणे बंधनकारक राहील अथवा या राशीचे समायोजन मेट्रो रेल्वे प्रकल्पामध्ये महानगरपालिकेकडुन करावयाचे ५ टक्के वित्तीय सहभागामध्ये समाविष्ट करण्यात येईल.
२. उपरोक्त जागा वाहनतळाचे उपयोगाकरीता देण्यात येत आहे. या वापराशिवाय इतर वापर महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.
३. जमीनीचा ताबा दिलेल्या दिनांकापासुन सदर जमीनीचे अतीक्रमणापासुन संरक्षण करण्याची जबाबदारी नागपूर मेट्रो रेल विभागाची राहील व या जमीनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसल्यास सदर जमीन महानगरपालिकेला परत करण्याची जबाबदारी नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशनची राहील.
४. नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशनला वाहनतळासाठी देण्यात आलेल्या जागेच्या परीसरात कोणत्याही प्रकारची अप्रीय घटना जिवहानी किंवा वित्तहानी झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी नागपर मेट्रो रेल कॉर्पोरेशनची राहील.
   जागा सुस्थितीत ठेवण्याची व देखभालीची जबाबदारी नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशनची राहील.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन आवश्यकतेनुसार वाढीव मुदतवाढ देण्याचे अधिकार आयुक्तांच्या मान्यतेने स्थायी समितीस नियमाप्रमाणे राहिल तसेच अटी व शर्ती मधील अट क्र. १ मध्ये जे नमूद आहे. ते वगळून, उपरोक्त भुगतान मेट्रो रेल कॉर्पोरेशन म.न.पा. ला भरणा स्वरुपात करावा लागेल. अट क्र. २,३,४ कायम या अटीसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 169ः— नेहरुनगर झोन क्र. ५ अंतर्गत ठराव क्र. ०७ दि. १८.०८.
{नेहरुनगर झोन 05} २०१७ अन्वये प्रभागनिहाय व पदनिहाय सन २०१७—२०१८ चे प्रभाग समितीचे अंदाजपत्रकास सोबतच्या यादीनुसार प्रभाग समिती ठराव क्र. ०७ दि. १८.०८.२०१७ चे अंदाजपत्रकास (परिशिष्ट अ) द्वारे प्रभाग समितीने मंजुरी प्रदान केली.

सबब, या प्रभाग समितीच्या अंदाजपत्रक २०१७—२०१८ (परिशिष्ट अ) स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 170ः— आशिनगर झोन क्र. ९, प्रभाग क्र. ०६/अ अंतर्गत विविध
{विद्युत विभाग} **ठिकाणी प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु.४९,७५,३९०/- च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा** प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 171ः— सन 2017—18 या आर्थिक वर्षात म.न.पा.
{आसीनगर झोन 09} अर्थसंकल्पानुसार क्षेत्रिय कार्यालय आसीनगर करीता रु. 729. 00 लक्ष उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

प्रभाग समिती ठराव क्र. 9, दि. 05.08.2017 अन्वये सन 2017—18 या आर्थिक वर्षासाठी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रभाग समितीस असलेल्या पदांतर्गत आसीनगर झोन क्र. 9 करीता प्राप्त रु. 729.00 लक्षास विविध प्रभागाकरिता विविध पदांतर्गत समान वाटप करण्यात आलेल्या नियोजनाचा ठराव विचारात घेऊन या अर्थसंकल्पात फेरबदल करण्याचे अधिकार मा. सभापती यांना प्रदान करण्यात आले. त्यानुसार क्षेत्रिय अंदाजपत्रकामध्ये आवश्कतेनुसार फेरफार करुन क्षेत्रिय कार्यालयाचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. त्यानुसार ''सहपत्र अ'' प्रमाणे क्षेत्रिय अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 172ः— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉट विभागाद्वारे नागपूर
{हॉट मिक्स प्लॉट} शहरातील रस्त्याची दूरुस्ती व सूस्थीती करण्याकरीता लेबर पुरवठा करण्याकरीता मे. एन. एन. बेलखुडे यांची प्राकलनिय दरापेक्षा 15.15% कमी दराची रु. 78,37,423.00 राशीची निविदा स्वीकृत करुन निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 173ः— मा. स्थायी समितीने ठराव क्र. 287 दि. 14/07/2017 अन्वये
{कारखाना विभाग} 02 नग रुग्णवाहिका DGS&D दरकरार अंतर्गत Delivery against payment या तत्वावर मे. SML ISUZU LTD या कंपनीकडून खरेदी करण्याकरीता रु. 20,96,798/- राशीच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान केलेली होती.

तथापि SML ISUZU LTD या कंपनीच्या दि. 04/08/2017 रोजीच्या पत्रात कळविल्यानुसार सदर कंपणीने सर्वोच्च न्यायलयाचे निर्देशाप्रमाणे BSIII या मानकाचे इंजिन बंद करण्यात आले असुन, त्याठीकाणी BSIV या मानकाचे इंजिनप्रणाली सुरु झाल्यामुळे 02 नग रुग्णवाहीकेसाठी जुने दर रु. 20,96,798/- राशीत बदल होवुन, नविण दराप्रमाणे ते रु. 29,99,931/- राशीत घ्यावी लागेल व जुन्या दरावर वाहन पुरवठा करण्यास असमर्थ असल्याबाबत पत्र विभागाला दिले.

SML ISUZU LTD या कंपनीतर्फे सादर करण्यात आलेले नविन दर रु. 29,99,931/- हे मा. खासदार निधीमधील प्राप्त राशी रु. 2096798/- पेक्षा रु. 9,03,133/- राशी जास्त असल्यामुळे विभागातर्फे 02 नग रुग्णवाहीका खरेदीस्तव पुन्हा प्रक्रीया करण्यात येत असुन, त्याअनुषंगाने शासनातर्फे नविन सुरु झालेल्या GeM या पोर्टलवर पहाणी केली असता, टाटा कंपणीचे Tata Winger Ambulance 32, 2.2L DICOR HR, AC, PS, BS-IV under GeM (Praduct ID : 111519) हे रुग्णवाहीका शासकीय दरावर आढळुण आली. सदर 01 नग रुग्णवाहीकेसाठी रु. 9,89,153/- राशीचे दर असुन 02 नग रुग्णवाहीकेसाठी रु. 18,78,306/- राशी खर्च राहील. सदर राशी मंजुर दर रु. 20,96,798/- पेक्षा रु. 2,18,492/- राशीने कमी असल्यामुळे सदर रुग्णवाहीका खरेदी करणे योग्य राहील. सदर खरेदी Delivery against payment या तत्वावर करण्यात येईल त्यासाठी टाटा मोटर्स प्रा.लि. यांचे नावे कींवा त्यांचे अधिकृत विक्रेता यांचे नावे रु. 18,78,326/- राशी धनादेश/मागणी धणाकर्षनाचा स्वरुपात प्रदाण करावी लागेल. रुग्णवाहीका खरेदीनतंर त्याचा विमा ओरिएन्टल ईन्शुरन्स कंपणी याचाकडुण रु. 27,064/- राशीत करावा लागेल. सदर खर्च सा.प्र.वि पद क्र. A20100121312 अन्वये राहील.

करीता मा. खासदार श्री. अविनाश पांडे यांचे निधीतुण 02 नग रुग्णवाहीका SML ISUZU LTD या कंपणीकडुण DGS&D दरावर रु. 20,96,798/- राशीत खरेदी करण्याचा प्रस्ताव रद्द करुन, त्याऐवजी मा. खासदार श्री. अविनाश पांडे यांचे मंजुर निधीतुण 02 नग टाटा कंपणीचे Tata Winger Ambulance 32, 2.2L DICOR HR, AC, PS, BS-IV under GeM (Praduct ID : 111519) हि रुग्णवाहीका शासकीय पोर्टलवर असलेले दर रु. 989153/- (प्रति रुग्णवाहीका) प्रमाणे 02 नग रुग्णवाहीका रु. 18,78,306/- राशीत किंवा प्रत्यक्ष खरेदीच्या वेळीस शासकीय अधिकृत GeM या पोर्टलवर असलेल्या कमी अथवा जास्त दरावर खरेदी करण्याचा व रुग्णवाहीका खरेदीनंतर रु. 27,064/- राशीत मे. ओरिएन्टल ईन्शुरन्स कंपणीकडुण विमाकृत करण्याचा प्रस्ताव मान्यतेस विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 174:— {वित्त विभाग} म.न.पा. वित्त विभागातील सेवानिवृत्ती वेतन विभागा अंतर्गत कामे, महालेखाकार व स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालयाकडील आक्षेप, वित्त विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे व बॅक ताळमेळाचे कामात मदत इत्यादी कामे तसेच वित्तीय वर्षात उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ, कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चिती व सेवानिवृत्तीचे प्रकरणाची तपासणी करणे इत्यादी कामासाठी मा. आयुक्तांचे आदेशान्वये श्री. वासुदेव कृ. झोरे, सेवानिवृत्त लेखाधिकारी, हयांची निश्चित मानधन प्रतिमहा रु. 15,000/— वर 6 महीन्या करीता नियुक्ती देण्यात आलेली असुन, ही मुदत दिनांक 31/10/2017 रोजी संपुष्टात येत आहे. प्रगतीपथावरील कामे पुर्ण करण्यासाठी तसेच वर नमुद इतर कामासाठी त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने मा. आयुक्तांचे दिनांक 20/09/2017 चे आदेशानुसार दि. 1/11/2017 पासुन पुढील एक वर्षाकरीता शासन निर्णय— सा.प्र.वि.क्र. संकीर्ण—2715/प्र.क्र.100/13, दि. 17/12/2016 नुसार सेवाकरार कंत्राटी पध्दतीने मानधनावर मुदतवाढ मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 175:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. 26 — क अंतर्गत वाठोडा चौक ते सरजु टाऊन (पानदान रोड ) येथिल वाठोडा परीसरातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 27,87,090/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 176:— नविन प्रशासकिय इमारतीला विद्युत पुरवठा पुरविण्याकरीता {नविन प्र. भवन प्रकल्प} स्वतंत्र MSEB Substation चे बांधकामाच्या रू. ३३,४५,५९०/— रकमेच्या सुधारीत प्राकलनास मंजूरी प्रदान करणे. तसेच सदरील कामाचे कंत्राटदार मे. हितेश कंस्ट्रक्शन यांना त्यांचे मंजूर निविदा दराने (प्राकलनिय दरांपेक्षा १.८० टक्के प्रतिशत ने अधिक ) रू. ९,१५,९०४/— रकमेचा कार्यादेश निर्गमित करण्यास्तव व सदरील अतिरिक्त रकमेची पद क्र. ६३८ मध्ये तरतूद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, या दरात G.S.T. चा समावेश आहे का हे विभागाने तपासावे या सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 177:— {पेंच प्रकल्प कक्ष} स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत नागपुर शहरातील घनकचरा व्यवस्थापनाकरीता मंजूर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सुधारीत करुन मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेवून,

नागपुर शहरातील एकीकृत घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत तयार केलेला विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनुदान प्राप्त करण्याकरीता शासनास सादर करण्यात आला होता. हा प्रकल्प अहवाल मेसर्स आर. जगताप ॲन्ड असोसिएटस्, नागपूर यांच्यामार्फत तयार करण्यात आला असून तो

रु. 339.00 कोटीचा प्रस्तावीत होता. या प्रकल्प अहवालास मा. स्थायी समीती ठराव क्र. 704 दि. 29.02.2016 व मनपा महासभा ठराव क्र. 234, दि. 18.03.2016 अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर प्रकल्प अहवाल राज्य शासनाकडे राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई येथे सादर केला असता त्यांनी सुचविल्याप्रमाणे सुधारीत प्रकल्प अहवाल रु. 308.00 कोटीचा तयार करण्यात आला व मंजूरीस्तव सादर करण्यात आला. या अहवालास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उच्चाधिकार समितीने (HPC) दि. 22.03.2016 च्या बैठकीमध्ये या अहवालास मंजूरी प्रदान केली आहे.

याअनुषंगाने उच्चाधिकार समितीने नागपूर शहराच्या एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाच्या रु. 308.00 कोटी अपेक्षित खर्चाच्या प्रकल्प अहवालास स्वच्छ भारत अभियानाच्या निकशानूसार रु. 288.68 कोटीला मान्यता प्रदान केली आणि VGF म्हणून रु. 96.22 कोटी च्या निधीला मंजूरी दिलेली आहे. त्यातील निम्मा म्हणजे रु 48.11 कोटीचा निधी मनपास उपलब्ध झालेला आहे.

उक्त मंजूर रु. 96.22 कोटी रुपंयापैकी रु. 70.00 कोटी मनपाच्या Waste to Energy (WtE) प्रकल्पाकरीता VGF म्हणून राखून ठेवले आहेत आणि उर्वरित रु. 26.22 कोटी निधी DPR मधील अन्य कामांकरीता राखून ठेवण्यात आले आहे. उक्त शासनमान्य विस्तृत प्रकल्प अहवालाच्या आधारे पुढील अंमलबजावणी करीता तत्कालीन मा. आयुक्तांच्या निर्देशांनुसार पुढील प्रमाणे आर्थिक आकृतीबंध राखून ठेवला आहे.

| Sr. No. | Description | Estimated Cost as per DPR. Amount in Cr. | SBM Grant in Cr. | Grant/Fund Allocation in Cr. | NMC's/PPP Operator contribution in Cr. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Primary Storage and Collection System (Bins & Wheel Barrow) | 4.26 | | 4.07 | 0.19 |
| 2 | Street Sweeping (Vehicle & PPE) | 20.72 | | 19.85 | 0.87 |
| 3 | Waste Treatment | | | | |
| a | Decentralised Composting (PPP) | 7.88 | | 0 | 7.88 |
| b | Construction & Demolition (C&D) (PPP) | 21 | | 0 | 21 |
| c | Processing and Disposal (PPP) | 248.01 | 96.22 | 70 | 178.01 |
| d | Incinerator for Disposal of Dead Animal Carcass | 2.39 | | 2.28 | 0.11 |
| e | Gasification by WtE | 0 | | | |
| 4 | Information and Communication Technology (ICT) | 3.15 | | | 3.15 |
| 5 | Information, Education and Communication (IEC) Project for Awareness to Citizens | 0.16 | | | 0.16 |
| 6 | Environmental Compliance Cost | 0.16 | | | 0.16 |
| | Total Cost in Crores | 307.73 | 96.22 | 96.22 | 211.53 |
| | Say Rs. | 308.00 | 96.22 | 96.22 | 211.53 |

दरम्यानच्या काळात, नवीन मार्गदर्शिका (SWM Rules, 2016 हस्तपुस्तिका / ठोस कचरा प्रबंधन नियम 2016) आणि नागपुर शहरातील घनकचरा व्यवस्थापनेत सुधार आणण्याकरिता मा. आयुक्तांनी सूचविल्याप्रमाणे मुळ प्रकल्प अहवालातील काही घटकांत बदल करणे आवश्यक आहे. त्याअनुसार, अहवालामध्ये काही नविन घटक घेण्यात आले आहे व काहींच्या संख्येत बदल करण्यात

आला आहे. मात्र, मुळ प्रकल्प अहवालाची एकूण अंदाजे किंमत न बदलता तशीच ठेवण्यात आलेली आहे.

सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये घेण्यात आलेल्या कामांमध्ये झालेले मुख्य बदल पुढील प्रमाणे आहेत.

Sr. No. 1) Community Bins (प्रकार, क्षमता व संख्यामधे बदल), Wheel Barrow (संख्येमधे बदल)

Sr. No. 2) Vehicles (प्रकार व संख्येमधे बदल); (Backhoe Loader, Tippers, Pocklean व Skid Steer Loader प्रस्तावित केले आहे.)

मुळ मंजुर केलेला अहवाल व सुधारीत अहवालाचा तुलनात्मक तक्ता घटक व राशी पुढील प्रमाणे राहील.

| Sr. No. | Description as per Original DPR | Amount in Crores | Description as per Revised DPR | Amount in Crores |
|---|---|---|---|---|
| 1 | Primary Storage and Collection System | 4.26 | Primary Storage and Collection System | 5.63 |
| 2 | Street Sweeping | 20.72 | Street Sweeping | 17.04 |
| 3 | Waste Treatment | | Waste Treatment | |
| a | Decentralised Composting | 7.88 | Nil (As centralize WtE plant is proposed) | 0.00 |
| b | Construction & Demolition (C&D) | 21.00 | Construction & Demolition (C&D) (PPP) | 21.00 |
| c | Processing and Disposal through WtE including reallocation of existing waste) | 248.01 | Processing and Disposal through WtE excluding relocation waste. (PPP) | 241.12 |
| | | | Waste Relocation | 18.82 |
| d | Incinerator for Disposal of Dead Animal Carcass | 2.39 | Incinerator for Disposal of Dead Animal Carcass | 3.50 |
| e | Gasification by WtE | 0.00 | Nil (Biomethanation Green Bus on PPP, considered in transport plan) | 0.00 |
| 4 | Information and Communication Technology (ICT) | 3.15 | Nil (shall be included in Smart City project and C&T operator scope) | 0.00 |
| 5 | Information, Education and Communication (IEC) Project for Awareness to Citizens | 0.16 | Information, Education and Communication (IEC) Project for Awareness to Citizens (for 2 years) | 0.50 |
| 6 | Environmental Compliance Cost | 0.16 | Environmental Compliance Cost | 0.19 |
| | Total Cost IN Crores | 307.82 | | 307.80 |
| | SAY | 308.00 | | 308.00 |
| 7 | Cost of Consultancy Services | | | |
| i | DPR Preparation Cost (1%) | 3.08 | | 3.08 |
| ii | Supervision (2%) | 6.16 | | 6.16 |
| 8 | Other Statutory Compliance Cost | 0.25 | | 0.25 |
| | Total Cost IN Crores | 317.49 | | 317.49 |
| | | 318.00 | | 318.00 |

दरम्यानच्या काळात नगरविकास विभाग (2) मंत्रालय, मुंबई यांच्या कडून मनपास उपलब्ध झालेल्या रु 48.11 कोटी निधी च्या विनियोगा बाबत विचारणा करण्यात आली आहे. स्थायी समितीने ठराव क्र. 704 दि. 29.02.2016 अन्वये मुळ अहवालास मान्यता प्रदान केलेली असल्यामूळे वरिल सुचविलेल्या मुळ प्रकल्प अहवालात करावयाची सुधारणा व केलेल्या बदलासह नविन प्रस्तावित कामे व त्या कामांकरीता आलेली सुधारीत प्राकलनीय राशीस मा. स्थायी समिती कडे पुन:श्च मान्यतेस ठेवणे

योग्य राहील व तद्नंतर ही बाब नगर विकास विभाग (2), मंत्रालय, मुंबई यांना माहीतीस्तव पाठविण्यात येईल. सध्या प्राप्त झालेल्या रु. 48.11 कोटीचा निधी खर्च म.न.पा द्वारे वरिल तक्याप्रमाणे करण्यात येईल, आणि उर्वरीत निधी उक्त करण्यासाठी शासनास मागणी करणे योग्य ठरेल. सुधारित घटक व आर्थिक दृष्टीने अनुदान विनीयोगाचे विवरण खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.

Details of Grant Received under SBM and VGF utilisation

| Sr. No. | Description | | Amount in Crores | Amount in Crores |
|---|---|---|---|---|
| 1 | Cost of Approved DPR | Rs. | 308.00 | |
| 2 | Eligible DPR cost under SBM<br>(Census Population 2011 x Rs. 1200 per capita)<br>(2405665 x 1200) | Rs. | 288.68 | |
| 3 | Grants Sanctioned Under SBM<br>(GoI Rs. 57.74 Cr.)<br>(GoM Rs. 38.49 Cr.) | Rs. | 96.22 | |
| | | | Ist Phase | IInd Phase |
| 4 | Grant Received by NMC under SBM (50%) | Rs. | 48.11 | 48.11 |
| 5 | Utilisation of Grant Under SBM | | Nil | -- |
| A | Primary Storage and Collection | | | |
| a | Bin<br>i) Litter Bins (Capacity 200 Ltrs. Qty. 1200 Nos.)<br>ii) Litter Bins (Capacity 120 Ltrs. Qty. 600 Nos.)<br>iii) Garbage Bins (Capacity 240 Ltrs. Qty. 250 Nos.)<br>iv) Secondary Storage Container (Capacity 4.5 cum, Qty. 240 Nos.) | Rs. | 5.63 | 0.00 |
| B | Streat Sweeping | | | |
| a | Mechanical Sweeper (6 Nos. x 1.60 cr.) (3 Nos. 1st Phase and 3 Nos. 2nd Phase) | Rs. | 7.35 | 9.05 |
| b | Wheel Barrows (Capacity 200/250 Ltrs. (Total 1000 Nos.) (500 Nos. to be procured in each phase) | | | |
| c | Hand Carts (Capacity 140 Ltrs., Qty. 1000 Nos.)(500 nos. to be procured in each phase) | | | |
| d | Backhoe Loader (76 HP) (e.g.:- Caterpillar 424B)(Qty. 6 Nos.)(2 Nos. 1st Phase and 4 Nos. 2nd Phase) | | | |
| e | Tippers (e.g.:-Tata LPK 1618)(Qty. 8 Nos.)(3 Nos. 1st Phase and 5 Nos. 2nd Phase) | | | |
| f | Pocklean (e.g.:- Hyundai R80)(Qty. 3 Nos.)(1 Nos. 1st Phase and 2 Nos. 2nd Phase) | | | |
| g | Skid Steer Loader (e.g.:- JCB Robot 155)(Qty. 5 Nos.)(3 Nos. 1st Phase and 2 Nos. 2nd Phase) | | | |
| | Total | Rs. | 7.35 | 9.05 |
| C | Waste Treatment | | | |
| a | Reserved for WtE out of Total Rs. 70 Cr. as VGF | Rs. | 35.00 | 35.00 |
| b | Incineration plant for Dead Animal Carcass | Rs. | 0.00 | 3.50 |
| D | Information, Education and Communication | Rs. | 0.13 | 0.37 |
| E | Environmental Compliance Cost | Rs. | 0.00 | 0.19 |
| | Total (in Crores) | | 48.11 | 48.11 |

वरील सूचविलेल्या बदलासह विस्तृत प्रकल्प अहवालास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

## Proposed Revised DPR for the Sanction of Standing Committee.

## Estimated Cost Comparison of Revised DPR Components for Integrated Solid Waste Management, Nagpur City

| Sr. No. | Description | Proposed DPR for Approval of Standing Committee Meeting Dt. 10/10/2017 | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Qty. | Unit | Unit rate | Amt. in Rs. |
| 1 | Primary Storage and Collection | | | | |
| a | Litter Bins (200 Ltrs)<br>(Rectangular Twin Bins floor mounted with stand) | 1200 | Nos. | 25000 | 30000000 |
| b | Litter Bins (120 Ltrs)<br>(Rectangular Twin Bins floor mounted with stand) | 600 | Nos. | 12500 | 7500000 |
| c | Garbage Bins (240 Ltrs)<br>(Rectangular Bins floor mounted with Wheels) | 250 | Nos. | 8000 | 2000000 |
| d | Secondary Storage Containers (4.5 Cum)<br>(Reinforced steel frame and cladded with sheets along with hook arrangement) | 240 | Nos. | 70000 | 16800000 |
| | | | | Sub Total | 56300000 |
| 2 | Street Sweeping | | | | |
| a | Mechanical Sweepers for road sweeping | 6 | Nos. | 16000000 | 96000000 |
| b | Wheel barrows for collection of street sweeping waste | 1000 | Nos. | 5000 | 5000000 |
| c | Hand Carts for collection of street sweeping waste | 1000 | Nos. | 13000 | 13000000 |
| d | Backhoe Loader (76 HP) | 6 | Nos. | 2623743 | 15742458 |
| e | Tippers | 7 | Nos. | 2342898 | 16400286 |
| f | Pocklean | 2 | Nos. | 3400000 | 6800000 |
| g | Skid Steer Loader | 3 | Nos. | 2350000 | 7050000 |
| h | Dozer | 1 | No. | 10442898 | 10442898 |
| | | | | Sub Total | 170435642 |
| 3 | Waste Treatment | | | | |
| a | Construction and Demolition Waste (C&D) | 1 | unit | 210000000 | 210000000 |
| b | Processing and Disposal (WtE) | 1 | unit | 2411200000 | 2411200000 |
| c | Reallocation of existing waste and site Development (for details refer Annexure-I) | 1 | unit | 188286000 | 188286000 |
| d | Incineration plant for Dead Animal Carcass | 1 | unit | 35000000 | 35000000 |
| | | | | Sub Total | 2844486000 |
| 4 | Information, Education & Communication (IEC) | 2 | Yrs | 2500000 | 5000000 |
| 5 | Environmental Compliance Cost | 1 | Yrs | 1900000 | 1900000 |
| | | | | Total | 3078121642 |
| | | | | Say in Crores | 308.00 |

विभागाने प्रस्तावित केलेल्या विषयामध्ये विभागाने केलेल्या सुचनेसह दुरुस्ती व फेरबदलासहीत प्रस्तावित विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 178:– {आरोग्य विभाग} Supply Installation Operation, Implementation and Maintenance of Kiosk fo NMC Hospital.

या कामा अंतर्गत महानगरपालिकेला 13 Kiosks व एक कंट्रोल रुम तयार करावयाचे आहे. यासाठी NUHM च्या दरावर प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. यासाठी वार्षिक रुपये 59,87,700/– प्रति वर्ष इतका खर्च अपेक्षित आहे. हे काम तीन वर्षासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. अटी व शर्ती सहीत निविदा प्रपत्र नस्तीत जोडलेले आहे.

Kiosks ची संख्या आवश्यकतेनुसार स्वास्थ विभागाद्वारे कमी किंवा जास्त करण्यात येईल.

प्रस्तावाला प्रशासकीय मंजुरी तसेच ई निविदा बोलविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 179 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर